**प्रेस नोट दिनांक १३/०४/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**बेवारस आजारी अवस्थेत मिळुन आलेल्या इसमाचे नातेवाईकांचा शोध घेवून**

**मयत बॉडी नातेवाईकांच्या ताब्यात दिली.**

दि. २७.०३.२०१९ रोजी भिकारदास मारूती मंदिरालगत असलेल्या गल्लीमध्ये एक विकलांग वयोवृध्द इसम तीनचाकी सायकलवर आजारी अवस्थेत असलेल्या स्थितीत आम्हांस दिसून आला. आम्ही फडगेटबीट मार्शल कर्मचारी यांना बोलावुन घेवून सदर इसमास वैद्यकीय उपचार तात्काळ मिळणेकामी ससुन हॉस्पीटल पुणे येथे ॲडमीट करण्यास सांगितले. सदर इसम ससुन हॉस्पीटल येथे ॲडमीट असताना खडक पोलीस ठाणेकडील पो.ना. २६७५ जगताप हे ससुन हॉस्पीटल याठिकाणी गेले असता, नमुद विकलांग वयोवृध्द इसम हा त्याची माहिती सांगता नव्हता, नमुद कर्मचारी यांनी त्यास थोडे बोलते केले असता, त्याने त्याचे नाव घनश्याम शंकर अभ्यंकर रा. २९० शनिवार पेठ पुणे व मुलाचे नाव रविंद्र घनश्याम अभ्यंकर असे असल्याचे सांगितले.

दि. २९.०३.२०१९ रोजी नमुद वयोवृध्द इसम घनश्याम अभ्यंकर हे ससुन हॉस्पीटल येथे उपचार चालु असताना मयत झाले. नमुद इसमाचे नातेवाईकांचा २९० शनिवार पेठ पुणे येथील पत्त्यावर पोलीस कर्मचारी पोना जगताप हे शोध घेत असताना सदर ठिकाणी असलेली बिल्डींग ही ३० ते ३५ वर्षापुर्वीची असून ती पाडुन नवीन बांधल्यामुळे तेथे नवीन रहिवासी राहवयास आल्याने मयत व्यक्तीच्या नातेवाईकांबाबत काहीएक माहिती मिळाली नाही. पोलीस कर्मचारी पो.ना. जगताप यांनी मयत व्यक्ती ही ब्राम्हण जातीची असल्याने पुजा अर्चा करीत असल्याची शक्यता असल्याने ओंकारेश्वर घाट याठिकाणी जावुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तेथे अरूण नावाचे केस कापण्याचे काम करणाया व्यक्तीकडुन मयत इसम घनश्याम अभ्यंकर यांचा मुलगा रविंद्र अभ्यंकर यांचा मोबाईल क्रमांक प्राप्त झाला. सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क साधुन रविंद्र अभ्यंकर यांना बोलावुन घेवून त्यांचे मयत वडिलांची बॉडी पुढील अंत्यविधीकामी ताब्यात दिली.

ता. १३/०४/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर